# जाहिरात

मा.प्रधान सचिव, नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचेकडील पत्र .जा.क्र./२०१४ /पदे /प्र.क्र१४२/२/का-१६दि.१६.१२.२०१४ नुसार राष्ट्रीय उपजिविका अभियान व राज्य शासन पुरस्कृत राज्य नागरी उपजिविका अभियानाची अंमलबजावणी करणेकरिता नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्यामार्फत भरावयाची व नगरपालिका या क्षेत्रीय स्तरावरील सहायक प्रकल्प अधिकारी मानधन रुपये ३००००/- व समुदाय संघटकांची कंत्राटी तत्वावर रु.१५०००/- या ठोक मानधनावर ११ महिन्याकरीता नियुक्ती करण्याबाबत निर्देश दिले आहे. सबब वरीलप्रमाणे कंत्राटी तत्वावरील सहायक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक या पदासाठी अर्हता खालीलप्रमाणे राहील.

जाहिरातीद्वारे विहीत नमुन्यातील अर्ज मागविणे तसेच उमेदवारांने अर्ज भरताना वस्तुनिष्ठ व अचूक माहिती भरावी तसेच अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे जोडावे. भरलेल्या माहितीच्या आधारे (मुळ कागदपत्रे पडताळणीच्या अधीन राहुन) उमदेवारांची निवड करण्यात येईल. निवड झाल्यानंतर माहिती चुकीची /दिशाभुल करणारी आढळल्यास निवड रद्द करण्यात येईल व पुढील गुणानुक्रमे असलेल्या उमेदवारांस संधी देण्यात येईल. उमेदवारांनी www.jalna.nic.in या संकेतस्थळावरुन अर्जाची व चलानची प्रिंट काढुन सदर चलानचा भरणा sbi बँकेच्या शाखेत करुन चलनची एक प्रत व अर्ज आवश्यक कागदपत्रासह जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर विकास शाखा जालना येथे समक्ष दाखल करावे. इतर मार्गाने आलेले, परिपूर्ण नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१) पदाचे नांव -

| **पदाचे नांव** | **सहायक प्रकल्प अधिकारी** |
|---|---|
| एकुण पद संख्या | ०१ (एक) |
| शैक्षणिक अर्हता | १) समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी प्रथमश्रेणी किंवा एमएसडब्ल्यु<br>२) अनुभव कोणत्याही सामाजिक संस्थेतील किमान ५ वर्षाचा अनुभव.तसेच प्राधान्याने दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील उमेदवारास प्राधान्य.<br>३) संगणक, ms office (word/Excel/powerpoint) यांचे ज्ञान तसेच Ms-Cit आवश्यक आहे. |
| वयोमर्यादा | १८ ते ४५ वर्षे |
| मासीक मानधन | ३०,०००/- प्रतिमाह याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाहीत. |
| **पदाचे नांव** | **समुदाय संघटक** |
| एकुण पदसंख्या | ६ (सहा) |
| शेक्षणिक अर्हता | १) १२ वी उत्तीर्ण<br>२) समाजविकास क्षेत्रामध्ये किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक विशेषत शहरी दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील उमदेवारास प्राधान्य .<br>३) संगणक ms office (word/Excel/powerpoint) यांचे ज्ञान तसेच Ms-Cit आवश्यक आहे |
| वयोमर्यादा | १८ ते ४५ - सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतंर्गत काम केलेल्या उमदेवारांना ५ वर्ष शिथील आहे. |
| मासीक मानधन | १५०००/- प्रतिमाह याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाहीत. |

२) **इतर अटी व शर्ती-**

१. आयुक्त तथा संचालक , नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील पत्र जा.क्र.रानाऊअ/२०१४/पदे /प्र.क्र१४२//का-१६ दि.१६.१२.१४ मधील निर्देश जिल्हाधिकारी आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांनी वेळोवेळो निर्गमित केलेले आदेश आणि मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

२. प्रस्तुत कंत्राटी तत्वावरील नियुक्ती ही वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय/परीपत्रक मार्गदर्शक सुचनांच्या अधिन असेल.

३.समुदाय संघटकाचे पदावर कंत्राटी पध्दतीने मानधनावर प्रथम ११ महिन्या करीतानियुक्ती देण्यात येईल.

४. उक्त शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील. उपरोक्त नियुक्ती पुर्णतः कंत्राटी तत्वावर असल्यामुळे शासकीय अधिकारी /कर्मचा-यांना देय असलेल्या सेवा,शर्ती, सोयी व सुविधा तसेच सवलती अनुज्ञेय राहणार नाही.

५. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावरील सहायक प्रकल्प अधिकारी यांना मासीक मानधन ३००००/- समुदाय संघटक यांना मासीक मानधन १५०००/- इतके ठोक मानधन देण्यात येईल. याव्यतिरिक्त इतर कोणतेही सुविधा व भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

६.प्रस्तुत सहायक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक म्हणुन नियुक्त होणा-या उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत शासकीय सेवेत समावेश होण्याबाबत मागणी करता येऊ शकणार नाही. शासकीय कर्मचा-याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ सेवेत समावेशन , वेतनश्रेणी,रजा, पेंशन इत्यादी सदर समुदाय संघटक यांना अनुज्ञेय नसतील.

७.मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय मुंबई यांनी या योजनेतंर्गत दिलेली उद्दीष्ट वेळेच्या आत साध्य करयाची जबाबदारी संबंधित समुह संघटकाची राहील.

८.नियुक्तीच्या कालावधीमध्ये सहायक प्रकल्प अधिकारी व समुदान संघटक यांची कोणत्याही प्रकारची गैरवर्तणुक निदर्शनास आल्यास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल. यासाठभ नियुक्ती आदेशातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

९.अर्जाचे रोजी रोजी अर्जदारावर कोणत्याही प्रकारचे गुन्हे प्रलंबित किंवा प्रस्तावित नसल्याचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र कामावर रुजु होण्यापुर्वी जोडणे आवश्यक आहे.

१०.सहायक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक यांना सेवेतुन मुक्त व्हायचे असल्यास किमान १५ दिवसांची पुर्वसुचना नियुक्ती प्राधिका-याकडे देणे किंवा १५ दिवसाच्या मानधनाची रक्कम नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडे जमा करणे आवश्यक राहील.विहित मुदतीत तशी पुर्व सुचना न दिल्यास अथवा मानधनाची रक्कम जमा न केल्यास आपणास पुन्हा कधीही समुदाय संघटक म्हणुन नियुक्ती देण्यात येणार नाही.

११.सहायक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक यांना कोणतीही रजा अनुज्ञेय नसल्याने दोन महिन्यातुन ०१ अनुपस्थिती अशा प्रकारे १ वर्षासाठी जास्तीत जास्त ०६ अनुपस्थिती मानधनासाठी ग्राहय धरण्यात येईल.

**३) सहायक प्रकल्प अधिकारी पदाची कर्तव्ये व जबाबदारी**

१. सहायक प्रकल्प अधिकारी हे शहर प्रकल्प अधिकारी यांचे नियंत्रणाखाली अभियानाचे काम पाहतील.

२. अभियान अंतर्गत मासिक प्रगती अहवाल अभियान संचालक व जिल्हा प्रशासन अधिकारी यांना ऑनलाईन सादर करतील.

३. नगरपरिषदेस अभियान अंतर्गत १०० टक्के उद्दीष्ट साध्य करणे .

४. सर्व लाभार्थ्यांची माहिती अदयावत करणे.

५. प्रत्येक वर्षाच्या एप्रिल महिन्यात सर्व घटक निहाय इच्छुक लाभार्थ्यांची यादी तयार करणे. जेणे करुन वर्षाचे उद्दीष्ट साध्य होईल.

६. दैनंदिन कामाची नोंदवही ठेवणे. सदर नोंदवहीत दैनंदिन कामकाजाची नोंद ठेवणे.

७. समुह संघटकांनी केलेल्या कामाचा साप्ताहिक अहवाल शहर प्रकल्प अधिकारी यांना सादर करणे.

८. प्रत्येक महिन्यात कमीत कमी १५ बचत गटांचे पदाधिकारी समवेत बैठक घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे.

९. शहरातील सर्व बँकांना दरमहा भेट देणे व सादर केलेल्या प्रकरणाची सदयस्थिती माहिती घेणे कर्ज प्रकरणात काही त्रुटी असल्यास संबंधिताकडुन त्याची पुर्तता करुन घेणे. व केलेल्या कार्यवाहीची नोंद नोंदवहीत ठेवणे.

१०. मानधनासाठी देयक सादर करताना त्यासोबत नोंदवहीची छायांकित प्रत सादर करणे.

११. वेळोवेळो राज्य अभियान संचालक यांनी दिलेले आदेशाचे पालन करणे.

१२.सहायक प्रकल्प अधिका-यांचे कार्यक्ष्ेात्र हे त्या महानगरपालिका / नगरपरिषदेच्या क्षेत्रापुरते मर्यादित असेल. तथापी लोकहित अथवा प्रशासकीय गजर इ.कारणांमुळे त्यांच्या बदल्या संबंधित महसुल विभागातील कोणत्याही महानगरपालिका / नगरपरिषदेत करणे अनुज्ञेय असेल.

१३.सहायक प्रकल्प अधिका-याला हमी पत्रातुन मुक्त व्हायचे असल्यास त्योन ३० दिवसाची पुर्वसुचना नियुक्ती प्राधिका-यास देणे आवश्यक राहील.

१४. इतर अटी व शर्ती केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या मार्गदर्शन सुचना तसेच शासन नगर विकास विभागाच्या दिनांक २८ ऑगस्ट २०१४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे असतील तसेच परिस्थितीनुसार इतर आवश्यक अटी नमुद करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

**४) समुदाय संघटकाच्या पदाची कर्तव्ये व जबाबदारी .**

१. समुदाय संघटक हे शहर प्रकल्प अधिकारी व सहायक प्रकल्प अधिकारी यांचे नियंत्रणाखाली अभियानाचे काम पाहतील.

२. दैनंदिन कामकाजाचा साप्ताहिक अहवाल सहायक प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत शहर प्रकल्प अधिकारी यांना सादर करतील.

३. आपल्या कार्यक्षेत्रामधील नागरी दारिद्रय रेषेखालील नागरीक सामाजिक अभिसरणामध्ये समाविष्ट होत आहेत. याची खात्री करणे.

४. स्वंयहाय गट , वस्तीस्तर संघ, शहर स्तरावरील समुह स्थापित करणे.

५. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये अभियानांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.

६. अपंगाच्या स्वयं सहाय गटाचे तसेच इतर स्वंय सहाय गटांचे बळकटीकरण करणे, तसेच त्यांना अभियांनातर्गत सेवा उपलब्ध करुन देणे.

७. स्वयं सहाय गट आणि बँकांची संलग्नता करणे.

८. शासकीय संस्थांशी संमन्वय साधने.

९. अभियान अंतर्गत अभिलेखे तयार करणे.

१०. अभियान अंतर्गत सामाजिक संपर्क,सामाजिक मालमत्तांची देखभाल दुरुस्ती यासारख्या विकास कामासांठी सहाय्यक करणे.

११. अभियान अंतर्गत अभिलेखे तयार करणे.

१२. सामाजिक स्तरांवरील बैठकांचे अयोजन करणे तसेच सदर बैठकींना उपस्थित रहाणे.

१३. कालबध्द अहवाल तयार करणे.

१४. शहर प्रकल्प अधिका-यांमार्फत देण्यात येणारे नविन उद्दीष्टे तसेच कर्तव्याचे पालन करणे.

१५. समुदाय संघटकांचे कार्यक्षेत्र हे त्या महानगरपालीका/नगरपरिषदेच्या क्षेत्रापुरते मर्यादित असेल.तथापी लोकशाही अथवा प्रशासकीय गरज इत्यादी कारणांमुळे त्यांच्या बदल्या संबंधित महसुल विभागातील कोणत्याही महानगरपालीका/नगर परिषदेत करणे अनुज्ञेय असेल.

१६. समुदाय संघटकास हमी पत्रातुन मुक्त व्हावयाचे असल्यास त्याने ३० दिवसांची पुर्वसुचना नियुक्ती प्राधिका-यास देणे आवश्यक राहीरल.

१७. इतर अटी व शर्ती केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या मार्गदर्शक सुचना तसेच शासन नगर विकास विभगाच्या दिनांक २८ ऑगस्ट २०१४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे असतील तसेच परिस्थितीनुसार इतर आवश्यक अटी नमुद करण्याचा अधिकार राखुन ठकवण्यात येत आहे.

**५. अर्ज सादर करावयाचा कालावधी व  सादर करणे बाबत आवश्यक सुचना.**

१. अर्जदार यांनी प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

२. उमेदवाराने आपले विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरून, आवश्यक रकमेचे चलन जोडून जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर विकास शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे कार्यालयीन वेळेत दिनांक  ०५/०१/२०१९ ते १९/०१/२०१९ या कालावधीत प्रत्यक्ष सादर करावे.

३. दिनांक १५/०१/२०१९ नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार आहे.

४. प्राप्त अर्जाची छाननी नंतर अपात्र अर्जाची यादी संकेतस्थावर दिनांक १९/०१/२०१९ रोजी प्रसिध्द केली जाईल. व त्यावर आक्षेप स्विकारण्याचा कालावधी दिनांक  १९/०१/२०१९ ते २२/०१/२०१९ राहिल.

५. प्राप्त अर्जाचे संख्येवरून सदर पदासाठी लेखी अथवा मुलाखत घेण्याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल. मुलाखत पत्र तसेच प्रवेश पत्र अर्जदारास वैयक्तीक रित्या उपलब्ध करून देण्यात येणार नाही. प्रवेश पत्र तसेच मुलाखत पत्र उमेदवार यांना या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळावर (www.jalna.nic.in) उपलब्ध करून देण्यात येईल.

६. मुलाखत पत्र / प्रवेशपत्र www.jalna.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.  ज्या उमेदवारास मुलाखत पत्र / प्रवेशपत्र इंटरनेटवरुन प्राप्त करुन घेण्यास काही तांत्रिक अडचणी असल्यास मुलाखतीच्या/परीक्षेच्या आधिच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नगर विकास शाखा जिल्हाधिकारी कार्यालय,जालना येथून मुलाखत पत्र / प्रवेशपत्र उमेदवाराने हस्तगत करावी

**७.शुल्क (फी)**ः-

(अ) प्रस्तत कंत्राटी भरती प्रक्रीयेसाठी खालील प्रमाणे शुल्क राहील.

| अ.क्र | संवर्ग | शुल्क फी | |
|---|---|---|---|
| | | राखिव प्रवर्ग | खुला प्रवर्ग |
| १ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी | १५०/- | ३००/ःः- |
| २ | समुदाय संघटक | १५०/- | ३००/- |

**(ब)  वरील प्रमाणे शुल्क हे ना-परतावा राहील. बँक चार्जेस उमेदवाराने भरणा करणे आवश्यक राहील.**

**(क) शुल्क संबंधी विशेष सुचना-** या कार्यालयाचे संकेतस्थावर अर्जासोबत दिलेल्या चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेच्या कोणत्याही शाखेतील विहीत चालानव्दारे भरणा केलेले शुल्कच ग्राहय धरले जाईल.

(ड) परीक्षा शुल्क हे बँक चालनाच्या स्वरुपात निवासी उपजिल्हाधिकारी जालना यांचे नावाने स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या कुठल्याही शाखेत चालानव्दारे **खाते क्रमांक 33162911185** वर जमा करणे आवश्यक आहे.

(इ) मागासवर्गीय उमेदवारंनी खुल्या प्रवर्गातुन अर्ज केल्यास त्यांना खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी असलेले परीक्षा शुल्क भरणा करणे आवश्यक आहे.

ःः **नियुक्तीचा कालावधीः-**  निव्वळ कंत्राटी स्वरुपात  ११ महिन्याच्या करार तत्वावर व ठोक मानधनावर नियुक्ती आदेश काढण्यात येईल. व संबंधिताच्या मागील कार्यमुल्यमापनाचे अवलोकन करुन पुढील कालावधीकरिता तथापी प्रथम वषाच्या शेवटच्या महिन्यात साप्ताहिक अहवालाच्या आधारे कामाचा आढावा घेवुन काम असमाधानकारक असल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**विशेष सुचना - १.** पदसंख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

२. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे , अंशत बदल करणे, प्रक्रियेत बदल करणे, भरतीप्रक्रीयेसंदर्भात उदभवणारे वाद, अन्य कोणतीही तांत्रिक / प्रशासकीय अडचण /तक्रारी याबाबतचे संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी जालना हे स्वतःकडे राखुन ठेवीत आहेत. वरील कोणत्याही बाबीवर जिल्हाधिकारी जालना यांचा निर्णय

अंतिम राहील. तसेच प्राप्त अर्जाची संख्या विचारात घेता लेखी किंवा मुलाखतीचा निर्णय घेण्यात येईल व त्याबाबत सर्वांना www.jalna.nic.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

३. प्रस्तुत कंत्राटी पदभरतीच्या संदर्भात वेळोवेळी शासनाकडुन किंवा वरिष्ठाकडुन प्राप्त होणा-या सुचनाप्रमाणे, कार्यवाही करण्यात येईल. सदरील प्रक्रियेत काही बाबी नमुद करावयाच्या राहील्यास किंवा अनावधानाने चुकीच्या नमुद केले असल्यास त्या प्रचलित शासन निर्देशानुसार व निर्णयाप्रमाणे राहतील.

**पदाच्या निवडीसाठी कार्यपध्दती आणि परिक्षेचे स्वरुप -**

१. उमेवाराची अंतिम निवड ही लेखी व तोंडी परीक्षेत मिळालेल्या एकुण गुणाच्या आधारे केली जाईल.

२. एकाच स्थानासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास शासन निर्णय दिनांक २७.६.२००८ मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्राधान्य क्रमाच्या आधारे उमदेवाराची अंतिम निवड केली जाईल.

३. लेखी परिक्षेत ४५% गुण मिळविणे आवश्यक राहील.

४. लेखी परिक्षेत ४५% गुण मिळविणा-या उमेदवारालाच मुलाखतीसाठी बोलाविले जाईल.

५. ८० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

६. लेखी परीक्षा ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल आणि परीक्षेचा दर्जा हा १२ वीच्या दर्जाच्या समान असेल.मराठी, इंग्रजी,सामान्यज्ञान, बौध्दीक चाचणी या विषयावरील प्रत्येकी २० गुण ठेऊन एकुण ८० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

७. लेखी परीक्षेतील पात्र उमेदवारांची १:३ या प्रमाणात गुणवत्तेनुसार मुलाखतीस बोलाविण्यात येईल.

८. २० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

९. लेखी परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल.

१०. लेखी परीक्षेसाठी व मुलाखतीसाठी उमेदवारास स्वखर्चाने यावे लागेल.

**इतर अटी व शर्ती -**

१.छाननीअंती वरील प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही /नियुक्ती रद्द होईल.

२.अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा व त्याचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्यांचेकडे असणे आवश्यक आहे. अर्जदार यांचेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन महसुल शासन महसुल व वन विभागाकडील निर्णय दिनांक २७ जुन २०११ नुसार त्यांचेकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झाला असल्याचा पुरावा असणे आवश्यक आहे.

३.सदर पदासाठी आवश्यक अर्हता असणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकतो.

४.गुणवत्ता यादीमध्ये येणा-या उमदेवारांना मुलाखतीचे वेळी मुळ कागदपत्रे तपासणी करण्यात येईल. उमदेवारांना मुलाखतीचे वेळी मुळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळविण्यारिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

५.जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र जालना या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी ऑफलाईन पध्दतीने रीतसर अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

६.विहित वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय /निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखाच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

७.नियुक्ती झाल्यानंतर उमेदवारांना आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांचे आदेशास अधीन राहुन जिल्हयातील कोणत्याही नगरपरिषदेमध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारांना १५ दिवसाचे आत रुजु होणे आवश्यक आहे.

८.उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

९.अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलाविण्याचा किंवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे समजु नये.

१०.एखादा उमदेवार लेखी परीक्षेत अधिक गुण मिळवुन देखील मुलाखतीला गैरहजर राहिल्यास त्याची नियुक्तीसाठी शिफारस करता येणार नाही मात्र एखादया उमदेवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळालेले असले तरी लेखीपरीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा उमेदवार नेमणुकीस पात्र असेल.

११.लेखी परीक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल.लेखी परीक्षा दिनांक ०३/०२/२०१९ रोजी घेण्यात येईल. लेखी परीक्षेमधुन पात्र होणा-या उमदेवारांना मुलाखतीचा दिनांक कळविला जाईल.

१२.लेखी व तोंडी परीक्षेमध्ये उमदेवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

१३.लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेल्या गुणांची अंतिम गुणवत्ता यादी www.jalna.nic.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

१४.सदरहु भरती प्रक्रीयेसंदर्भात काही तक्रार असल्यास, या कार्यालयाच्या dpojalna@yahoo.com या मेलवर पाठविण्यात यावी.

**(रविंद्र बिनवडे)**

**दिनांक -** ०५/०१/२०१९

**ठिकाणी-जालना**

**अध्यक्ष**

**शहर अभियान व्यवस्थापन कक्ष**

**तथा जिल्हाधिकारी जालना**

**(वृत्तपत्रासाठी थोडक्यात जाहिरात प्रारुप)**

**जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी जालना यांचे कार्यालय जालना**

**(नगरपालिका प्रशासन विभाग)**

**क्रमांक - २०१८ /नपाप्र /आस्था / ०१** **दिनांक ०५ / ०१/२०१९**

राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान/ राज्य नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत नगर परिषद जालना, परतुर येथील सहायक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटक ही कंत्राटी स्वरुपाची पदे या करिता ऑफलाईन पध्दतीने पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविणेत येत आहे. विस्तृत जाहीरातीचा मसुदा, अर्जाचा नमुना,अटी व शर्ती जिल्हाधिकारी जालना यांचे नोटीस बोर्डवर आणि जिल्हाधिकारी जालना यांच्या www.jalna.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन, पात्र उमदेवारांनी ऑफलाईन अर्जाची प्रिंट सदर संकेतस्थळावरुन काढुन अर्ज दिनांक- १५/०१/२०१९ पर्यंत जिल्हा प्रशासन अधिकारी,नगर विकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे सायं ५.४५ वाजेपर्यत सादर करावे.

**पदभरतीचा कार्यक्रम -**

| | | |
|---|---|---|
| ०१ | अर्ज स्विकारण्याचा कालावधी | जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन ते दिनांक १५ /०१/२०१९ रोजी सायं ५.४५ पर्यंत सदर तारखेपर्यंत दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध झालेल्या माहितीनुसार ऑफलाईन अर्ज सादर करावयाचे आहेत. |

**उपलब्ध पदसंख्या कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदाचा पदनिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहेत.**

**सहायक प्रकल्प अधिकारी भरावयाच्या पदांचा तपशील - परतुर नगरपरिषद - ०१ पद**

| **अ.क्र.** | **प्रवर्ग** | **महिला** | **सर्वसाधारण** | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| ०१ | खुला | - | ०१ | ०१ |

**समुदाय संघटक ही पदे भरावयाच्या पदांचा तपशील -परतुर नगरपरिषद-०१ पद व जालना नगरपरिषद- ०५ पदे**

| **अ.क्र.** | **प्रवर्ग** | **महिला** | **सर्वसाधारण** | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| ०१ | अनु.जमाती (ST) | - | ०१ | ०१ |
| ०२ | इमाव (OBC) | ०१ | ०१ | ०२ |
| ०३ | सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (SEBC) | ०१ | ०१ | ०२ |
| ०४ | खुला (OPEN) | | ०१ | ०१ |
| | एकुण | ०२ | ०४ | ०६ |

**टिप - भरती प्रक्रीयेच्या संदर्भाने सविस्तर जाहिरात www.jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलबध आहे.**

**( उमेश कोठीकर)**
**सदस्य सचिव तथा जिल्हा प्रशासन अधिकारी**
**नगरविकास शाखा जालना**

**(रविंद्र बिनवडे)**
**अध्यक्ष**
**शहर अभियान व्यवस्थापन कक्ष**
**तथा जिल्हाधिकारी जालना**

**अर्जाचा नमुना**

**जिल्हाधिकारी कार्यालय जालना**

| |
|---|
| फोटो या<br>ठिकाणी<br>लावणे. |

प्रति,
मा.अध्यक्ष , जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी
जालना

विषय - समुदाय संघटक / सहायक प्रकल्प अधिकारी या पदासाठी अर्ज सादर करण्याबाबत.

१) उमदेवाराचे संपुर्ण नांव --
२) पत्रव्यवहाराचा पत्ता -
३) ई-मेल -
४) दुरध्वनी /मोबाईल क्रमांक -
५) जात ------------------- पोटजात -------------------
६) अर्जाचा प्रवर्ग / वर्गवारी ( खालीलपैकी लागु असलेल्या रकान्यात टिक करणे. )

| अ.जा.<br>SC | अ.ज<br>ST | वि.जा.(अ)<br>VJA | भ.ज.(ब)<br>NTB | भ.ज.(क)<br>NTC | भ.ज.ड<br>NTD | वि.मा.प्र.<br>SBC | इ.माव.<br>OBC | सा.व<br>शै.मागास<br>प्रवर्ग<br>SEBC | खुला<br>OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

७) जन्मतारीख -

| | | |
|---|---|---|
| ८) | अर्जदार उन्नत व प्रगत गटाबाहेरील आहेत का? (होय /नाही) | |
| ९) | अर्जदार महाराष्ट्र राज्याचे मुळ रहिवासी आहेत का ?(होय/नाही) | |
| १०) | अर्जदार पुरुष आहे की स्त्री आहे ? | |
| ११) | अर्जदार माजी सैनिक आहेत का ? (होय /नाही) | |
| १२) | अर्जदार स्वातंत्र्य सैनिक यांचे पाल्य आहेत का ? (होय / नाही) | |
| १३) | अर्जदार अंशकालीन कर्मचारी आहेत का ? ( होय / नाही) | |
| १४) | अर्जदार प्रकल्पग्रस्त आहेत का ? (होय /नाही) | |
| १५) | अर्जदार भुकंपग्रस्त आहेत का ? (होय / नाही ) | |
| १६) | अर्जदार खेळाडु आहेत का? ( होय / नाही ) असल्यास खेळाचा प्रकार | |
| १७) | परीक्षा शुल्क भरणा करण्यात आलेल्या चलानचा<br>क्रमांक व दिनांक -<br>राष्ट्रीयकृत बँकेचे नावं - | रुपये - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८) | अर्जदाराची शैक्षिणिक पात्रता | | | |
| अ.क्र. | परीक्षेचे नांव | संस्थेचे /मंडळाचे नांव | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
| ०१ | इयत्ता १० वी | | | |
| ०२ | इयत्ता १२ वी | | | |
| ०३ | पदवी | | | |
| ०४ | पदव्युत्तर | | | |
| ०५ | संगणक प्रमाणपत्र | | | |
| ०६ | मराठी टंकलेखन | | | |
| ०७ | इंग्रजी टंकलेखन | | | |
| ०८ | इतर अर्हता<br>(असल्यास) | | | |
| १९) | सेवायोजना व इतर कार्यालयात नाव नोंदणी केलेली असल्यास याबाबत माहिती | | | |
| | कार्यालयाचे नांव -<br>नोंदणी क्रमांक -<br>नोंदणी दि. | | | |
| २०) | कामाचा अनुभव असल्यास त्याबाबत माहिती<br><br>विभागाचे नांव -<br>पदाचे नाव - मासिक वेतन -<br>कालावधी - ------------------ पासून ते -------------------- सध्या कार्यरत आहेत का ?-<br><br>कार्यरत असल्यास कार्यालयाचा पत्ता - | | | |

मी --------------------------------------------- असे प्रमाणित करतो / करते की, मी जाहिरात योग्य रीतीने वाचली असून मी ---------------------------------- या पदासाठी अर्ज सादर केला आहे. मला जाहीरातीमधील अटी व शर्ती मान्य आहेत. मी नमुद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकीची अगर खेटी आढळून आल्यास माझी उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व माझा या पदावर कोणताही हक्क राहणार नाही याची मला जाणीव आहे. तसेच या संदर्भात नियुक्ती अधिकारी जो निर्णय देतील तो मला मान्य राहील व होणा-या कार्यवाहीस मी पात्र राहील आिण भरती बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ-

दिनांक - उमेदवाराची स्वाक्षरी

टिप - उमेदवाराने चलानामागे आपले संपूर्ण नाव,पदाचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करावा.

प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो / करते की, आपले कार्यालयाकरिता सहायक प्रकल्प अधिकारी / समुदाय संघटक या पदाची जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असून सदर जाहीरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत, तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी आहे. वर नमुद केलेली माहिती चुकीची व खोटी आढळून आल्यास माझी या पदांकरिता उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिका-यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ - जालना उमेदवाराची स्वाक्षरी

ठिकाणी -

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ

प्रतिज्ञापत्र

नमुना -अ (नियम ४ पहा)

मी,

------------------------------------- श्री.---------------------------------------------------- यांचा /यांची मुलगा /मुलगी /पत्नी , वय ------- वर्षे राहणार ------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो /करते की,

१) मी ------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ---------- इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------- आहे.(असल्यास,जन्मदिनांक नमूद करावी)-----------------

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

स्थळ - जालना

दिनांक - उमदेवाराची स्वाक्षरी

**टिप - अविवाहीत उमेदवारांनी नमुना अ प्रतिज्ञापत्र लागू नाही असे नमूद करुन स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. स्वाक्षरी नसल्यास अर्ज अपूर्ण आहे असे समजून रद्द ठरविण्यात येईल.**

<table>
<tr><td>CHALLAN FORM (CASH VOUCHER) -01</td><td>CHALLAN FORM (CASH VOUCHER) -01</td></tr>
<tr><td>
BRANCH COPY<br>
STATE BANK OF INDIA<br>
Application Fee Details<br>
Recruitment of Communtiy Organiser<br><br>
Account NO - 33162911185<br>
Candidate's Name - Mr /Mrs /Kum.- ----------------------------------------------<br><br>
Cataegory * - ST / OBC /SEBC - 150rs /-<br>
OPEN - 300rs /-<br><br>
State Bank of india<br>
Branch -<br><br>
Branch Code No# -<br><br>
Journal No# -<br><br>
Deposit Date -<br><br>
Application Fee (Rupees ---------------------------------------------------- only)<br><br>
Signature of Depositor Authorized Signatory<br>
Stamp<br><br>
Address ----------------------------<br><br>
-----------------------------------<br>
Phone / mobi.no.<br>
* Tick whichever is applicable.<br>
# Fee receiving branch is advised to write the Deposit journal No. and branch code no. above invariably.
</td><td>
CANDIDATE'S COPY<br>
STATE BANK OF INDIA<br>
Application Fee Details<br>
Recruitment of Community Organiser<br>
Account NO - 33162911185<br>
Candidate's Name - Mr /Mrs /Kum.- ------------------------------------------------<br><br>
Cataegory * - ST / OBC /SEBC - 150rs /-<br>
OPEN - 300rs /-<br><br>
State Bank of india<br>
Branch -<br><br>
Branch Code No# -<br><br>
Journal No# -<br><br>
Deposit Date -<br><br>
Application Fee (Rupees ---------------------------------------------------- only)<br><br>
Signature of Depositor Authorized Signatory<br>
Stamp<br><br>
Address ----------------------------<br><br>
-----------------------------------<br>
Phone / mobi.no.<br>
* Tick whichever is applicable.<br>
# Fee receiving branch is advised to write the Deposit journal No. and branch code no. above invariably.
</td></tr>
</table>